# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल, जि. रायगड-४१०२०६

## ३९५ वी शिवजयंती दि. १९/०२/२०२५

**उद्दिष्टे -** १) शिवाजी जयंती निमित्त मिरवणुकीचे आयोजन करणे.

२) शिवजयंती निमित्त नाट्य स्पर्धेचे आयोजन करणे.

३) नाट्य स्पर्धेचे मूल्यांकन करणे.

४) नाट्य स्पर्धेसाठी परीक्षकाची नियुक्ती करणे.

५) नाट्य स्पर्धेचे बक्षीस व प्रमाणपत्र वितरण करणे.

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल मध्ये दि. १९/०२/२०२५ रोजी ३९५ वी शिवजयंती पारंपारिक पद्धतीने मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून व लेझीम ढोल व ताशांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत शिवजयंती निमित्त मिरवणूक काढण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम व सर्व प्राध्यापक तसेच प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी होते. शिवजयंती निमित्त महाविद्यालयात श्री. संभाजीराव बाबुराव भोसले यांच्या सन्मानार्थ विविध नाट्यस्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये **जिजाऊंचा शिवबा, स्त्री शक्तीचा संवर्धक, पावनखिंड, जाणता राजा, शेर शिवाजी, गड आला पण सिंह गेला, रयतेचा राजा, चौरंग, स्वराज्याचे स्वप्न, प्रतापगडावरील अफजलखानाची भेट** इत्यादी नाटिका प्रथम व द्वितीय वर्ष बी.एड. च्या विद्यार्थ्यांनी सादर केल्या. या नाट्यस्पर्धेमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले. तसेच स्त्री उत्कृष्ट अभिनय पुरुष उत्कृष्ट अभिनय यांची निवड करून सर्वांना माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या नाट्यस्पर्धेचे श्री. निळकंठ भुरे व श्री. जीवन राठोड यांनी परीक्षक म्हणून मूल्यांकन केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक डॉ. उज्वला डोणे यांनी केले. सूत्रसंचालन शोभा बोरे यांनी केले.

### उपस्थित संख्या

प्राचार्य व प्राध्यापक – ६

प्रथम वर्ष बी.एड. विद्यार्थी – ३९

द्वितीय वर्ष बी.एड. विद्यार्थी - ३२

परीक्षक – २

कर्मचारी संख्या – ६

Scanned with OKEN Scanner

**प्रथम क्रमांक - शेर शिवाजी** द्वितीय वर्ष बी .एड. सहभागी विद्यार्थी - सायली जाधव, अक्षय नारकर, प्रतिभा जाधव, सविता मुळीक, पुष्पा दिघा.

**द्वितीय क्रमांक - चौरंग** प्रथम वर्ष बी.एड. सहभागी विद्यार्थी - अनघा म्हात्रे, ऋणाली कचरे, मोहिनी भगत, रश्मी नाडकर्णी, जॉकी वाघमारे, श्रीराम फुफाणे, नीलम शेलार, उषा चौधरी.


**तृतीय क्रमांक - पावनखिंड** प्रथम वर्ष बी. एड. सहभागी विद्यार्थी - आकाश राठोड, माधुरी साळुंखे, तनुश्री आठवले, स्वाती घोरपडे, आरती नखाते, आकाश पारधी, प्रशिका पवार, ऋतुजा म्हात्रे.

**उत्कृष्ट अभिनय महिला** - माधुरी साळुंखे, प्रथम वर्ष बी. एड.

**उत्कृष्ट अभिनय पुरुष** - संकेत तोरस्कर, द्वितीय वर्ष बी. एड.






Scanned with OKEN Scanner

ाज
जरी

रायांच्या
र्पण करून
वेळी माजी
ात, नितीन
ड, जगदीश
ील, ज्येष्ठ
जाधवसर,
व, ज्येष्ठ
ी, कापसे,
हापालिका
, विद्यार्थी,
ा पुष्प अर्पण
यक्त केला.
ळातर्फे चहा,
मंडळाच्या
ुल पाटील,
जय गायकर,
नी केले.

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेलमध्ये शिवजयंती पारंपारिक पद्धतीने मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून व लेझीम ढोल व ताशांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत शिवजयंती निमित्त मिरवणूक काढण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम व सर्व प्राध्यापक तसेचप्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी होते. शिवजयंती निमित्त महाविद्यालयात संभाजीराव बाबुराव भोसले यांच्या



सन्मानार्थ विविध नाट्यस्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या नाट्यस्पर्धेमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले.

स्त्री उत्कृष्ट अभिनय पुरुष उत्तकृष्ट अभिनय यांची निवड करून सर्वांना प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या नाट्यस्पर्धेचे निळकंठ भुरे व जीवन राठोड यांनी परीक्षक म्हणून मूल्यांकन केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक डॉ. उज्वला डोणे यांनी केले.

Scanned with OKEN Scanner